४९१५


माहितीचा अधिकार

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालय महाराष्ट्र राज्य,**

**कोकण भवन, सहावा मजला नवी मुंबई ४०० ६१४.**

☎/ 🖷:-- २२,२७५७१३९१. Website:www.mahalfa.in E.Mail:ad.report@mahalfa.in


क्र.स्था-१८ /ब/अभिलेख उपलब्ध/दंडात्मक कारवाई/वलेप अहवाल/११६३ दिनांक : 16 JUL 2015

प्रति,

सह संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- लेखापरीक्षणासाठी विहित कालावधीत अभिलेख उपलब्ध न झाल्यास लेखापरीक्षण संपल्यानंतर १ महिन्याच्या आत दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करणेबाबत.

संदर्भ :- १. ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र. लेखाप-२०१३/प्र.क्र.८१/वित्त ५, दिनांक १८/०२/२०१४.

२. या संचालनालयाचे पत्र क्र.स्था/१८/ब/अभिलेखे उपलब्ध /दंडात्मक कारवाई/वलेप अहवाल/ १२६९ दिनांक ०८/०८/२०१४.

महोदय,

संदर्भिय परिपत्रक क्र.१ अन्वये ग्रामविकास विभागाने लेखापरीक्षणासाठी विहित कालावधीत अभिलेख उपलब्ध न झाल्यास लेखापरीक्षण संपल्यानंतर १ महिन्याच्या आत दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करणेबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुषंगाने संचालनालयाने संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये कार्यवाही करणेबाबत अवगत केले आहे.

तरी उपरोक्त शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग दिनांक १८/२/२०१४ मधील सूचनांनुसार यापुढे संबंधित संस्थेकडून लेखापरीक्षणासाठी विहित कालावधीत अभिलेखे उपलब्ध न झाल्यास स्थानिक निधी लेखापरीक्षा जिल्हा कार्यालयांनी लेखापरीक्षण संपल्यानंतर १ महिन्याच्या आत दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करावा. तसे न केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आपला,

(कि.ब.तायडे)
उपसंचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा
नवी मुंबई

प्रत:- सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, ---- सर्व--- यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.